## :: जाहिरात ::

'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या ग्रंथालयीन कामकाजाकरीता ग्रंथपाल, माहिती व संशोधन या ग्रंथालयीन कामासाठी **एमपॅनेलमेंटद्वारे (Empanelment) करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता खाली नमूद अर्हता व पात्रता, अनुभव इत्यादींची पूर्तता करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून ई-मेलद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**I) शैक्षणिक व इतर अर्हता :-**

(अ) उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान किंवा वाणिज्य शाखेची पदवी किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण केलेली असावी.

(ब) उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(क) सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

(ड) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

(इ) अर्ज सादर करणारा अधिकारी ज्या दिनांकास अर्ज सादर करेल त्या दिनांकास तो सेवानिवृत्त झालेला असला पाहिजे.

(ई) मराठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

**II) अनुभव :-**

(अ) उमेदवारास सुसंस्थापित ग्रंथालयातील कामाचा किमान ७ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे व या संदर्भात वैधानिक कामकाजाच्या क्षेत्रातील टिप्पणे तसेच सांख्यिकीय, आलेखन व सूचीविषयक बाबतीत संशोधनात्मक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

(ब) पत्रकारीतेचा अनुभव असावा.

**III) वयोमर्यादा :-** करार पद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**IV) इतर माहिती :-**

**१) नियुक्तीचा कालावधी :-** निवड झालेल्या उमेदवाराची प्रथम एक वर्षासाठी करार पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल.

२/..

| | |
|---|---|
| **२) निवड प्रक्रिया :-** | ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या पात्र अर्जांची संख्या विचारात घेऊन उमेदवाराची निवड अर्जांची छाननी करुन पात्रतेच्या व गुणवत्तेच्या (Eligibility & Merit) निकषांवर करण्यात येईल. |
| **३) इतर :-** | उमेदवारांकडून ई-मेलद्वारे प्राप्त होणारा एखादा अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत. |
| **४) पारिश्रमिक :-** | करार पद्धतीने नियुक्ती होणाऱ्या सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांचे पारिश्रमिक दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहिल. |

**५) नियुक्तीच्या कालावधीतील अटी व शर्ती :-**

अ) करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील व सदरहू व्यक्तीस याबाबत बंधपत्र / हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

ब) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहिल व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

पात्र सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी सोबतच्या नमुन्यात संपूर्ण तपशीलासह व आवश्यक त्या कागदपत्रांसह स्कॅन करुन आपले अर्ज मा.सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन, मुंबई-४०० ०३२ यांना अग्रेषित करुन **जाहिरातीच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत rajendra.bhagwat@nic.in या ई-मेलवर सादर करावेत. फक्त ई-मेलद्वारे सर्व आवश्यक त्या स्कॅन केलेल्या कागदपत्रांसह विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांचाच विचार केला जाईल.**

सही/-
**( ऋतुराज ज. कुडतरकर )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**ठिकाण : मुंबई.**

**दिनांक : ६ मे, २०२०**

## :: अर्जाचा नमूना ::

'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या ग्रंथालयीन कामकाजाकरीता ग्रंथपाल, माहिती व संशोधन या ग्रंथालयीन कामासाठी एमपॅनेलमेंटद्वारे (Empanelment) सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या नियुक्तीकरीता अर्ज.

**उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे.**

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव (देवनागरी लिपित) :-

(इंग्रजीत) :-

२) अर्जदाराचा संपूर्ण कायमचा पत्ता :-

३) अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-

४) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६) भ्रमणध्वनी क्रमांक :-

७) आधार क्रमांक :-

८) जन्म, दिनांक व वय :-

९) शैक्षणिक अर्हता :-

१०) अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :** **अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

**दिनांक :**